ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

[प्रत्ये]क महिन्याच्या [प]हि[ल्]या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख २ जानेवारी, १९६३ | अंक १

## विविध माहिती

**ऱ्होडेशियाची तांबें देण्याची तयारी**—चीनच्या सरकारनें भारतावर केलेलें लष्करी आक्रमण परतवून लावण्यास मदत करण्याची तयारी ऱ्होडेशिआच्या पंतप्रधानांनीं दाखविली आहे. ऱ्होडेशिआ भारताला तांबें पुरविण्यास तयार असल्याची घोषणा त्यांनीं केली आहे. मात्र किती तांबें देणार, देणगी म्हणून देणार का कर्ज म्हणून देणार, ह्यासंबंधींचा तपशील देण्यांत आलेला नाहीं.

**दीर्घ कालपर्यंत मिळणारी लष्करी मदत**—भारतावर चीनचें आक्रमण झाल्यानंतर तांतडीची शस्त्रास्त्रांची मदत म्हणून ब्रिटननें जवळजवळ अमेरिकेइतकीच म्हणजे १·५ कोटी पौंड किंमतीचीं शस्त्रास्त्रें धाडलीं. परंतु भारताची स्वतःची लष्करी ताकद वाढविण्यासाठी लागणारी दीर्घकालीन मदत ब्रिटनला अमेरिकेच्या बरोबरीनें देतां येईल किंवा नाहीं ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येत आहे.

**रशियाला केळ्यांची निर्यात**—महाराष्ट्र सहकारी मार्केटिंग सोसायटी आणि रशियाची परराष्ट्रीय व्यापार-संघटना ह्यांच्यांत केळ्यांच्या निर्यातीबद्दल करार करण्यांत आला आहे. महाराष्ट्राच्या जळगांव भागांतील १,००० टन केळीं मुंबईमार्गें रशियाच्या ओडेसा बंदरांत बोटीनें पाठविण्याचें काम लवकरच सुरू होईल. भारतामधील केळीं युरोपांत निर्यात होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**भारत-न्यूझीलंड व्यापार**—भारत व न्यूझीलंड ह्यांच्यामध्यें दरसाल होणाऱ्या व्यापारामुळें भारताला सुमारें ७·४ कोटी पौंडांचें परदेशीय चलन मिळतें. भारत न्यूझीलंडला तागाचा माल, सुती कापड व इतर माल मिळून अंदाजें ९·४ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करतो. उलट, न्यूझीलंडकडून २ कोटी रुपयांची लोकर आयात करण्यांत येते. न्यूझीलंडमधील स्त्रियांना भारतामधील कापड फार आवडतें.

**चीनमधून पळून जाणारे नागरिक**—चीनमधील कम्युनिस्ट राजवटीला कंटाळून हजारों चिनी नागरिक हाँगकाँगला जात असतात. हे नागरिक प्रथम चीनमधील मॅकॅओ ह्या पोर्तुगीज वसाहतींत जातात व तेथून मिळेल त्या मोडक्या-तोडक्या होड्यांनीं हाँगकाँगला येतात. ही वाहतूक करणाऱ्या खलाशांच्या टोळ्या भरपूर कमाई करीत आहेत. एका माणसाला हाँगकाँगला येण्यासाठी ५०० हाँगकाँग डॉलर्स द्यावे लागतात.

**ओरिसा राज्यांत कॉफीची लागवड**—ओरिसा राज्यांत कॉफीची लागवड करण्याची एक योजना राज्य सरकारनें आखली आहे. प्रथम ४०० एकर जमिनींत कॉफीची लागवड करण्यांत येणार असून हळुहळु लागवडीचें क्षेत्र ५ वर्षांत ४,००० एकरांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. सध्यां फक्त ६८ एकरांत कॉफीची लागवड करण्यांत आली आहे.

**कम्युनिस्ट देशांशीं होणारा व्यापार**—रशिया आणि कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील इतर देश ह्यांच्याशीं होणारा भारताचा व्यापार १९६३ सालीं २० ते २५ टक्क्यांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारताच्या एकूण निर्यात व्यापारांत कम्युनिस्ट राष्ट्रगटांशीं होणारा व्यापार अधिक जोरानें वाढत आहे. १९६३ सालीं भारत ह्या राष्ट्रगटाला कापडाची निर्यात प्रामुख्यानें करील.

**अमेरिकेंतील गुन्हेगारी**—अमेरिकेंतील गुन्हेगारींत झालेल्या वाढीची आंकडेवार माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. बँकांवरील दरोड्यांत २१ टक्के, खुनांत १ टक्का, बलात्कारांत २ टक्के, शारीरिक इजांच्या गुन्ह्यांत ४ टक्के, चोऱ्यांत ५ टक्के, लबाडींत ६ टक्के आणि मोटारगाड्यांच्या चोऱ्यांत ७ टक्के, अशी वाढ झालेली आहे.

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३। ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—**ना. शं. कानिटकर**

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

...क महिन्याच्या ...या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार तारीख २ जानेवारी, १९६३ अंक १

## विविध माहिती

**र्‍होडेशियाची तांबें देण्याची तयारी**—चीनच्या सरकारनें भारतावर केलेलें लष्करी आक्रमण परतवून लावण्यास मदत करण्याची तयारी र्‍होडेशिआच्या पंतप्रधानांनीं दाखविली आहे. र्‍होडेशिआ भारताला तांबें पुरविण्यास तयार असल्याची घोषणा त्यांनीं केली आहे. मात्र किती तांबें देणार, देणगी म्हणून देणार का कर्ज म्हणून देणार, ह्यासंबंधींचा तपशील देण्यांत आलेला नाहीं.

**दीर्घ कालपर्यंत मिळणारी लष्करी मदत**—भारतावर चीनचें आक्रमण झाल्यानंतर तांतडीची शस्त्रास्त्रांची मदत म्हणून ब्रिटननें जवळजवळ अमेरिकेइतकीच म्हणजे १·५ कोटी पौंड किंमतीचीं शस्त्रास्त्रें धाडलीं. परंतु भारताची स्वतःची लष्करी ताकद वाढविण्यासाठीं लागणारी दीर्घकालीन मदत ब्रिटनला अमेरिकेच्या बरोबरीनें देतां येईल किंवा नाहीं ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येत आहे.

**रशियाला केळ्यांची निर्यात**—महाराष्ट्र सहकारी मार्केटिंग सोसायटी आणि रशियाची परराष्ट्रीय व्यापार-संघटना ह्यांच्यांत केळ्यांच्या निर्यातीबद्दल करार करण्यांत आला आहे. महाराष्ट्राच्या जळगांव भागांतील १,००० टन केळीं मुंबईमार्गे रशियाच्या ओडेसा बंदरांत बोटीनें पाठविण्याचें काम लवकरच सुरू होईल. भारतामधील केळीं युरोपांत निर्यात होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**भारत-न्यूझीलंड व्यापार**—भारत व न्यूझीलंड ह्यांच्यामध्यें दरसाल होणाऱ्या व्यापारामुळें भारताला सुमारें ७·४ कोटी पौंडांचें परदेशीय चलन मिळतें. भारत न्यूझीलंडला तागाचा माल, सुती कापड व इतर माल मिळून अंदाजें ९·४ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करतो. उलट, न्यूझीलंडकडून २ कोटी रुपयांची लोकर आयात करण्यांत येते. न्यूझीलंडमधील स्त्रियांना भारतामधील कापड फार आवडतें.

**चीनमधून पळून जाणारे नागरिक**—चीनमधील कम्युनिस्ट राजवटीला कंटाळून हजारों चिनी नागरिक हाँगकाँगला जात असतात. हे नागरिक प्रथम चीनमधील मॅकॅओ ह्या पोर्तुगीज वसाहतींत जातात व तेथून मिळेल त्या मोडक्या-तोडक्या होड्यांनीं हाँगकाँगला येतात. ही वाहतूक करणाऱ्या खलाशांच्या टोळ्या भरपूर कमाई करीत आहेत. एका माणसाला हाँगकाँगला येण्यासाठीं ५०० हाँगकाँग डॉलर्स द्यावे लागतात.

**ओरिसा राज्यांत कॉफीची लागवड**—ओरिसा राज्यांत कॉफीची लागवड करण्याची एक योजना राज्य सरकारनें आखली आहे. प्रथम ४०० एकर जमिनींत कॉफीची लागवड करण्यांत येणार असून हळूहळू लागवडीचें क्षेत्र ५ वर्षांत ४,००० एकरांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. सध्यां फक्त ६८ एकरांत कॉफीची लागवड करण्यांत आली आहे.

**कम्युनिस्ट देशांशीं होणारा व्यापार**—रशिया आणि कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील इतर देश ह्यांच्याशीं होणारा भारताचा व्यापार १९६३ सालीं २० ते २५ टक्क्यांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारताच्या एकूण निर्यात व्यापारांत कम्युनिस्ट राष्ट्रगटांशीं होणारा व्यापार अधिक जोरानें वाढत आहे. १९६३ सालीं भारत ह्या राष्ट्रगटाला कापडाची निर्यात प्रामुख्यानें करील.

**अमेरिकेंतील गुन्हेगारी**—अमेरिकेंतील गुन्हेगारींत झालेल्या वाढीची आंकडेवार माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. बँकांवरील दरोड्यांत २१ टक्के, खुनांत १ टक्का, बलात्कारांत २ टक्के, शारीरिक इजांच्या गुन्ह्यांत ४ टक्के, चोऱ्यांत ५ टक्के, लबाडींत ६ टक्के आणि मोटारगाड्यांच्या चोऱ्यांत ७ टक्के, अशी वाढ झालेली आहे.

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३॥ ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

### अमेरिकेला खादी निर्यात करण्याचे करार

भारत व अमेरिका ह्यांच्यामधील व्यापारांत भारत अमेरिकेला प्रथमच मोठ्या प्रमाणावर खादीचें कापड निर्यात करणार आहे. ह्या कापडांत साधी खादी व रेशमी खादी ह्यांचा समावेश आहे. खादी आणि ग्रामोद्योग मंडळातर्फे मुंबई उपनगर ग्रामोद्योग संघटनेनें हें कापड पुरविण्याचे करार दोन अमेरिकन कंपन्यांशीं केले आहेत. करारांची मुदत दहा वर्षांची आहे. पहिल्या करारांतील शर्तीप्रमाणें अमेरिकन कंपनी नोव्हेंबर १९६२ ते ऑक्टोबर १९६३ ह्या कालांत भारताकडून ४ ते ६ लाख मीटर्स सुती खादी घेणार आहे. खादीच्या खरेदींत दरसाल वाढ करण्यांत यावयाची आहे. ही वाढ होत होत १९६६-६७ पर्यंत २० ते २५ लाख मीटर्स कापसाच्या सुताची खादी निर्यात करण्यांत येऊं लागेल. पुढील पांच वर्षांच्या कालांत खादीच्या निर्यातीची हीच पातळी कायम ठेवण्यांत येणार आहे. दुसऱ्या कराराप्रमाणें रेशमी खादीची निर्यात करण्यांत येणार असून निर्यातींत दरसाल वाढ करण्यांत यावयाची आहे. जून १९६२ ते मे १९६३ पर्यंत दुसरी अमेरिकन कंपनी १ ते ३ लाख मीटर्स रेशमी धाग्याची खादी आयात करणार आहे. निर्यातींत दरसाल करावयाची वाढ लक्षांत घेतां १९६६-६७ पर्यंत ३ ते १२ लाख मीटर्स रेशमी खादी निर्यात करण्यांत येऊं लागेल. पुढील पांच वर्षेपर्यंत एवढीच निर्यात करण्यांत येईल. पहिल्या वर्षीं निर्यात करण्यांत यावयाच्या खादीची किंमत दरसाल ५३ लाख रुपये होईल. पांचव्या वर्षापासून निर्यात करण्यांत येणाऱ्या खादीची किंमत दरसाल जवळजवळ २.२५ कोटी रुपये होईल.

---

### भारी वजनाची यंत्रसामग्री बनविण्याचे कारखाने

रशिया आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्यांनीं आर्थिक व तांत्रिक मदत देऊं करून भारी वजनाची यंत्रासामग्री बनविण्याचे कारखाने उभारण्याचें मान्य केलें होतें. ह्या कारखान्यांची उभारणी अधिक द्रुतगतीनें करण्याची तयारी त्यांनीं दाखविली आहे. रांची येथें काढण्यांत येत असलेल्या कारखान्याची उभारणी त्वरेनें पूर्ण करण्यासाठी रशियन तंत्रज्ञांचें एक मंडळ भारतांत आलें आहे. दुर्गापूर येथें कोळशाच्या खाणीसाठी लागणारी यंत्रसामग्री तयार करण्याच्या कामींहि रशियानें सहकार्य देऊं केलें आहे. झेक तंत्रज्ञांची एक तुकडीहि लवकरच भारतांत येणार आहे. भारतांत शस्त्रास्त्रनिर्मितीचे कारखाने काढण्याच्या कामीं भारी वजनाच्या यंत्रसामग्रीचे संकल्पित कारखाने पायाभूत ठरणार आहेत. कारण त्यांच्यामुळें शस्त्रास्त्रांच्या निर्मितीबाबत स्वयंपूर्ण होण्यास मोलाची मदत होणार आहे.

---

### कार्ल मार्क्सचे गणितशास्त्रावरील कागदपत्र

१९ व्या शतकांत होऊन गेलेल्या कार्ल मार्क्स ह्या विद्वानाचें नांव मुख्यत: समाजवादी विचारांचा प्रणेता व भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जबरदस्त टीकाकार म्हणून प्रसिद्ध आहे. तथापि ह्या थोर विचारवंताचा गणितशास्त्राचा अभ्यास व्यापक स्वरूपाचा होता. गणितशास्त्रावरील सिद्धांताविषयीं त्यानें उणीपुरीं १,००० पृष्ठें मजकूर लिहिलेला असून हे सर्व कागदपत्र रशियांत प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. अर्थशास्त्रांत गणितशास्त्राचा उपयोग करण्यांत आला पाहिजे असें त्याचें मत होतें. कोणत्याहि शास्त्रांत गणितागत पद्धतीचा उपयोग केल्याशिवाय त्या शास्त्राला पूर्णता येणार नाहीं असा विचार त्यानें व्यक्त केलेला आहे. कागदपत्रांचें संशोधन करणाऱ्या प्राध्यापकांच्या मतानें आधुनिक गणितशास्त्रांतील प्रगति थोड्या-फार प्रमाणांत कार्ल मॉक्र्सनें आधींच हेरली होती.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर—**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |
| **कायम ठेव—** | | | |
| १ महिना | ... | ... | ३.३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३.५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३.७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४.२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४.५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*

*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

वा. ग. अळतेकर,
बी. कॉम.
कार्यकारी संचालक.



# दी बेळगांव बँक लि.

शेड्यूल्ड बँक ] ◆ [ स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : बेळगांव

◆

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ८,००,००० |
| ठेवी | रु.२,१२,००,००० |
| खेळतें भांडवल | रु.२,३०,००,००० |

आपल्या ह्या बँकेची सुरक्षितता, मजबुती आणि सेवाभाव ह्याबद्दल ख्याति कां आहे, ह्याचें रहस्य प्रगतीचे हे आंकडेच स्पष्ट करतील.

बँकेच्या २८ शाखांपैकी कोणत्याहि शाखेंत या आणि आपल्या सेवेची आम्हांला संधि द्या !

## बचत, हीच आजची गरज !

बी. बी. पोतदार,
बी. ए., एलएल. बी.
चेअरमन

ए. आर. नाईक,
बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर

# अर्थ

बुधवार, ता. २ जानेवारी, १९६२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## जागतिक निर्गतीमधील भारताचा हिस्सा

### वाढत्या किंमतीमुळें उतरतें प्रमाण

१९५१ ते १९६१ या दहा वर्षांत जागतिक निर्गत ७,६९९ कोटी डॉलर्सवरून ११,८७० कोटी डॉलर्सवर गेली. म्हणजे ती दरसाल ४½% गतीनें वाढली. ह्याच मुदतींत भारताची निर्गत १६१ कोटी डॉलर्सवरून १४० कोटी डॉलर्सवर घसरली. म्हणजे ती १३% नें कमी झाली.

१९५४ नंतरच्या सात वर्षांत जागतिक निगत ५५% नें सुधारली; हिंदी निर्गत १८% नें वाढली. म्हणजे जागतिक निर्गतीच्या वार्षिक गतीच्या मानानें (६%) हिंदी निर्गतीची गती २·५% होती. ह्याच मुदतींत हिंदी राष्ट्रीय उत्पन्न ३·५% नें वाढत गेलेलें आहे.

खालील तक्त्यांत भारताच्या परिस्थितीची तुलनात्मक माहिती आढळेल:—

( आंकडे कोटी डॉलर्सचे )

| वर्ष | जग (१) | भारत (२) | (२) चें (१) शीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १९५१ | ७६९९ | १६१ | २·०९ |
| १९५४ | ७७६८ | ११८ | १·५२ |
| १९५५ | ८४५९ | १२८ | १·५१ |
| १९५६ | ९३९५ | १३० | १·३८ |
| १९५७ | १००८८ | १३८ | १·३७ |
| १९५८ | ९६१३ | १२२ | १·२७ |
| १९५९ | १०१८९ | १३१ | १·२८ |
| १९६० | ११३६८ | १३३ | १·१७ |
| १९६१ | ११८७० | १४० | १·१८ |

निर्गत होणाऱ्या हिंदी मालाच्या किंमतीचा निर्देशांक १९५९ मध्यें १०० होता, तो १९६० मध्यें १०९ आणि १९६१ मध्यें १११ झाला. अशा परिस्थितींत निर्गतीमध्यें समाधानकारक कशी होणार ? आपल्या निर्गतीचें जागतिक निर्गतीशीं पडणारें प्रमाण सालोसाल उतरत चाललें आहे.

## सिंधू नदीच्या खोऱ्याचा विकास

सिंधू नदीच्या खोऱ्याचा विकास करण्याची एक योजना अमेरिकेनें पाकिस्तानला सुचविली आहे. पूर्वीच्या पश्चिम पंजाब सिंध-भावलपूर ह्या विभागांतील ५० लाख एकर जमीन पाणी साठून राहिल्यामुळें आणि क्षारामुळें निकामी झालेली आहे. ह्या जमिनींतील पाण्याचा निचरा करून क्षार कमी करण्यासाठीं ही योजना तयार करण्यांत आली आहे. ती अंमलांत आणण्यासाठी १,००० कोटी रुपये खर्च येणार आहे. योजना पूर्ण होण्यास २५ वर्षांचा कालावधि लागेल. परंतु ती पूर्ण झाल्यावर पाकिस्तानचें शेतीचें उत्पन्न तिपटीनें वाढेल आणि अर्थव्यवस्थेंत क्रांतिकारक बदल होईल.

## अमेरिका चीनला अन्नधान्य पुरविणार काय ?

गेलीं दोन–तीन वर्षे चीनमध्यें अनेक कारणांनीं अन्नधान्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर भासत आहे. अन्नधान्याच्या उत्पादनाच्या वाढीच्या योजना चीननें आखलेल्या होत्या; परंतु त्या अयशस्वी झाल्यामुळें चीनला परदेशांतून अन्नधान्याची आयात करावी लागते. अन्नधान्याची टंचाई पडूं लागल्यानें चीनची सर्वच अर्थव्यवस्था विस्कळीत होऊं लागली आहे. म्हणून १९६० सालापासून चीननें कॅनडा व फ्रान्स ह्या देशांकडून धान्याची आयात केली. अमेरिकेंतील शिलकी अन्नधान्याची चीनला कांहीं प्रमाणांत निर्यात करण्यांत येण्याचा संभव होता. अमेरिकेच्या पी. एल्. ४८० कायद्याप्रमाणें भारताला शिलकी अन्नधान्य पाठविण्यांत येतें. त्याचप्रमाणें चीनमधील खपाटी पोटें भरण्यासाठी धान्याची निर्यात करण्यांत यावी असें दडपण चालू सालच्या आरंभीं अमेरिकन सरकारवर आणण्यांत येत होतें. प्रे. केनेडी ह्यांनीं अशा निर्यातीची शक्यता ध्वनिताहि केली होती. अजूनहि अमेरिकेंतील धान्य व्यापारी संघटनेकडून शिल्लक धान्य चीनला निर्यात करण्याचा प्रश्न उपस्थित करण्यांत येत आहेच. परंतु चीननें भारतावर आक्रमण केल्यापासून अमेरिकेंत चीनविरोधी वातावरण अधिक तापत असल्याच्या वार्ता येत आहेत. कांहीं अमेरिकन व्यापारी कंपन्या चीनकडून डॉलर्स घेऊन गहूं व बार्ली चीनला द्यावें अशा मताच्या आहेत. परंतु चीनला परदेशी चलनाची टंचाई तीव्रतेनें भासत असल्यानें रोख किंमत देऊन अन्नधान्य आयात करणें त्याला अतिशय कठीण जात आहे. चीनमधील अन्नधान्याची परिस्थिति आयातीच्या अभावीं आणखी खालावण्याची शक्यता आहे.

## लष्करी स्वरूपाच्या मदतीला मर्यादा

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं चीनच्या आक्रमणामुळें उद्भवलेली परिस्थिति आणि भारताला मिळणारी लष्करी मदत ह्यांविषयीं आपले विचार व्यक्त केले आहेत. मुंबई येथें एका प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं सध्यां जगापुढील मुख्य प्रश्न आक्रमक बनलेल्या कम्युनिझमला कसा थोपवावा हा आहे. त्यामुळें चीननें भारतावर केलेलें आक्रमण थांबविण्यांत यावें असेंच अमेरिकेला वाटत असलें पाहिजे. म्हणून अमेरिका भारताला भरपूर मदत करण्यास तयार असणें साहजिक आहे. भारताचें लष्कर आणि विमानदल ह्यांची ताकद वाढवून त्यांना अद्यावत् बनविलें पाहिजे ही गोष्ट वादातीत आहे. परंतु, हें साध्य करण्याइतकी लष्करी स्वरूपाची मदत अमेरिकेकडून उधार-उसनवारीनें मिळणें शक्य नाहीं. अमेरिकेनें कितीहि मोठ्या प्रमाणावर मदत दिली तरी भारताला रुपयाच्या चलनांत प्रचंड खर्च करावा लागणार आहे. भारताच्या अर्थमंत्र्यांनीं लष्करी खर्चासाठी आणखी ४०० कोटी रुपयांची तरतूद अंदाजपत्रकांत करावी लागेल असें म्हटलें आहे. इतका अवाढव्य जादा खर्च करण्यामुळें पंचवार्षिक कार्यक्रम बंद करावा लागेल काय, असा

प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. ह्या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाहीं. कारण लष्करी खर्चासंबंधीं करण्यांत आलेला अंदाज अनेक अज्ञात घडामोडीमुळें चुकण्याचा संभव आहे. काश्मीरचा प्रश्न, भारत-पाकिस्तानचे संबंध, चीननें एकतर्फी केलेली युद्धबंदी, इत्यादी घटना पुढें कोणतें वळण घेतात ह्यावर लष्करावर करण्यांत यावयाच्या खर्चाचा आंकडा अवलंबून आहे.

---

### कांहीं निवडक देशांचें सैनिकी बळ

| देश | लोकसंख्या (कोटी) | सैनिक (हजार) | सैनिकांचें लोकसंख्येशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| भारत | ४३·३ | ५५० | ०·१३ |
| चीन | ७०·० | २५०० | ०·३६ |
| अमेरिका | १७·९ | २४९५ | १·३९ |
| ग्रेटब्रिटन | ५·२ | ५२७ | १·०१ |
| फ्रान्स | ४·५ | ९७३ | २·१५ |
| प. जर्मनी | ५·३ | २४० | ०·४५ |
| रशिया | २१·६ | २७२५ | १·२८ |
| इजिप्त | २·८ | १५० | ०·५३ |
| आयर्लंड | ०·३ | १४ | ०·४९ |
| इस्राएल | ०·२ | ३०० | १४·१५ |
| पाकिस्तान | ८·१ | १०३ | ०·१३ |
| ऑस्ट्रेलिया | १·० | ४८ | ०·४८ |

भारत, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, आयर्लंड आणि पाकिस्तान ह्या देशांतील सैनिकांनीं पूर्णपणें स्वेच्छेनें तो पेशा पत्करलेला आहे; अमेरिका, ग्रेटब्रिटन आणि प. जर्मनी ह्यांत सक्ति आणि स्वेच्छा ह्यांचें कमी–जास्त प्रमाणांत मिश्रण आहे. बाकीच्या देशांत कांहींतरी प्रकारची सक्तीच आहे. इस्राएलमध्यें सक्तीचें प्रमाण सर्वांत जास्त आहे.

---

### भाक्रा धरणावरील वीजकेंद्र

भाक्रा धरणाच्या उजव्या बाजूला रशिआच्या मदतीनें उभारण्यांत येणार असलेलें विद्युतनिर्मिति केंद्र आग्नेय आशिआंतील सर्वांत मोठें असेल. ह्या केंद्राचें काम पूर्ण झाल्यावर ६०० मेगॅवॅट वीज निर्माण होऊं शकेल. केंद्रांच्या नकाशांचा अभ्यास करण्यासाठी रशिअन तंत्रज्ञांची एक तुकडी भारतांत आली आहे. केंद्रांचा मुख्य आराखडा ह्यापूर्वीच सादर करण्यांत आला असून तो हिंदी एंजिनिअर्सनीं सामान्यतः मान्य केला आहे. कांहीं किरकोळ फेरबदल करण्यांत येत असून त्यासंबंधीं हिंदी एंजिनिअर्सचा सल्ला घेण्यांत येत आहे.

---

### कॅनडाकडे रेल्वेच्या रुळांची मागणी

भारतानें कॅनडांतील डोमिनिअन स्टील अँड कोल कॉर्पोरेशन ह्या संघटनेकडे रेल्वेच्या रुळांची मोठी मागणी नोंदविली आहे. ह्या रुळांची किंमत सुमारें ८० लाख डॉलर्स होईल. इतर देशांतील कंपन्यांनींहि रूळ पुरविण्याची तयारी दाखविली होती; परंतु कॅनडांतील कंपनीनें त्यांच्याशीं स्पर्धा करून ऑर्डर मिळविली. ह्या व्यवहारासाठी लागणारें परदेशीय चलन जागतिक बँकेतर्फे मिळणार आहे.

---

## प्राप्तिपत्रक–मार्गदर्शिका*

प्राप्तीवरील कराची अंमलबजावणी सुरू होऊन साठ–सत्तर वर्षें झालीं तरी अशा तऱ्हेच्या प्रत्यक्ष कराची झळ अजूनहि दहा-अकरा लाखांहून जास्त लोकांना लागत नाहीं. यांतील सुद्धां शें. ऐंशीहून अधिक लोक करपातळीच्या सर्वांत खालील एक–दोन थरांमध्यें आढळून येतात. प्रांतवारी जरी अशा तऱ्हेच्या व्यक्तिगत कराच्या अंमलबजावणीची नक्की आंकडेवारी माहीत नसली तरी महाराष्ट्रांतील एकंदर आर्थिक जीवनाचा आढावा घेतल्यास ज्या कांहीं व्यक्तींना प्राप्तीकर यावा लागतो, त्या बहुतांशीं करपात्रीय थरांच्या खालच्या दर्जातीलच असाव्यात असें अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं. तरीपण गेल्या कांहीं वर्षांतील आर्थिक वाढीस लागलेल्या क्षेत्रांचा व्याप पाहिल्यानंतर व विशेषतः त्यांतील दिवसेंदिवस वाढणारा वेग पाहिल्यावर इतर प्रांतांप्रमाणें महाराष्ट्रांतहि प्राप्तीकर देणाऱ्यांची संख्या वाढत जाणें संभवनीय आहे. शिवाय या बाबतींतील कायदा व त्यांत वारंवार होणारे बदल पाहिल्यावर प्राप्तीकर आकारण्याबाबत किती गुंतागुंत आहे याची जाणीव प्राप्तीकर देणाऱ्यास व देऊं लागणाऱ्यास हरघडी होते. अशा वेळीं मातृभाषेंतून लिहिलेली एखादी मार्गदर्शिका असावी असें साहजिकच वाटतें. आज या लोकशाही युगांत प्रत्येकाला आपले न्याय्य हक्क प्रस्थापित करावेंसें वाटतात. पण त्याचबरोबर त्याला आपल्या जबाबदाऱ्याहि ओळखाव्या लागतात. प्राप्तीवरील कर हा भारतांतील सर्व प्रत्यक्ष करांमध्यें सर्वांत मोठा व सर्वांत जास्त उत्पन्न मिळवून देणारा कर आहे. इतकेंच नव्हे तर दुसरे प्रत्यक्ष कर, म्हणजे संपत्ती-कर, वारसा–कर, जादा-खर्च-कर, वगैरे सुद्धां प्राप्तीकराच्या क्षेत्रांतच गोंवलेले आहेत. आज अनेक वेळां प्राप्तीकर नुसता करपात्रीय उत्पन्नाहि मिळविण्यावरच आहे असें नाहीं तर अप्रत्यक्षपणें कंपन्यांच्या डिव्हिडंडमधून प्रथम वसूल केला जातो व त्यावरील रिफंड करपात्रियास मागाहून नक्की करून घ्यावा लागतो. अशा तऱ्हेनें प्राप्ती-कर कायद्याखालील निरनिराळ्या कलमांतून करपात्रियास मिळणाऱ्या सवलतींच्या व सुटींच्या पूर्ण माहितीची जरूर प्रत्येक व्यक्तीस असते. त्याचप्रमाणें आपल्या समाजरचनेंत अजून संयुक्त कुटुंबपद्धति व त्यावर आधारलेली स्वाभाविक भागीदारीपद्धति हिच्या मार्फत कुटुंबाची एकंदर प्राप्ति ठरत असते. अशा स्थितींत मिळालेल्या कुटुंबाच्या उत्पन्नांचा मेळ व्यक्तिगत उत्पन्नांशीं घालावा लागतो. याहि बाबतींत हिंदू कायद्यान्वयें होणारी गुंतागुत आहेच. गेल्या कांहीं वर्षांत छोटेमोठे उद्योगधंदे महाराष्ट्रांत विकास पावत आहेत. त्याचप्रमाणें प्राप्तीकर कायदा अधिक-अधिक व्यापक होत आहे. अशा वेळीं कोणत्याहि व्यक्तीस किंवा कुटुंबास प्राप्तीकराचें ओझें आपल्याला योग्य रीतीनें किती उचलावयास लागेल याची साहजिकच जाणीव असावी लागते. प्राप्तीकरकायद्यांत इतर अनेक कायद्यांप्रमाणें कांहीं ठिकाणीं शिथीलता राहिलेली असणारच. त्याचा फायदा लोक घेत असतात. याहि दृष्टीनें प्राप्ती-कर-कायद्याची नेमकी ओळख असणें आवश्यक असतें. म्हणजे सारे करपात्रीय एकाच सुपानें भरडले जाऊं नयेत. सदर पुस्तकांत या बाबतींत योग्य तीं उदाहरणें देऊन आपल्याला नेमका किती कर यावा लागेल याचें चांगलें मार्गदर्शन केलें आहे. शिवाय पुस्तक मराठी सोप्या भाषेंत लिहिलेलें असल्यानें व त्यांतील विवेचन सुबोध व सरळ असल्यानें वाचकांस उपयुक्त ठरावें अशी अशा आहे.

---

* प्रत्यक्ष-कर विवेचनमाला पुष्प १ लें. लेखक शं. अ. कुलकर्णी इन्कम टॅक्स ऑफिसर ( रिटायर्ड ) पृ. स. १५१ किं. रु २–५०.

## श्री. ग. रा. साठे यांचें जीवन–चरित्र

### श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांची स्मृतिग्रंथाला प्रस्तावना

महाराष्ट्राच्या औद्योगिक पुनर्रचनेचा इतिहास ६०-६५ वर्षांपेक्षा विशेष जुना नाहीं. त्यापूर्वी बाजारांत सर्वत्र परदेशी मालाचाच सुळसुळाट आढळून येई. परकी राजवटीचाच तो एक परिणाम. देशांतील संपत्तीचा लोंढा त्यामुळें परदेशाकडे लागून हिंदी प्रजा कंगाल व बेकार बनत चालली होती. देशावर मोठाच कठीण प्रसंग आला होता. त्यांतून त्याची सुटका व्हायची कशी?

परकीय कारखानदारांच्या मगरमिठींतून देशाची मुक्तता करायची तर त्याला एकच मार्ग. हरएक प्रकारचा माल तयार करणारे स्वदेशी कारखाने निघायला हवेत. पण ते काढायचे कशाच्या आधारावर? सरकारकडून उत्तेजन मिळण्याची आशा नाहीं; भांडवल गोळा होणें महाकर्म कठीण; या क्षेत्रासंबंधीचा कुणास अनुभव नाहीं आणि लोकमतहि प्रतिकूलच. सगळीकडूनच असा कोंडमारा. या परिस्थितींत कारखाने काढायला कोण पुढें येणार?

अशा प्रतिकूल काळांत स्वदेशीचा मंत्र ऐकून ज्या महाराष्ट्रीय तरुणांनीं या क्षेत्रांत मोठ्या आत्मविश्वासानें उडी घेतली व प्रयत्नांची पराकाष्ठा करून एकेक उद्योग नांवारूपाला आणला त्यांची खरोखर मोठी धन्यता होय. नव्या वैभवशाली व सौख्यसंपन्न महाराष्ट्राचे हेच आद्य रचनाकार असून त्यांचा आदर्श भावी काळांत देशाला अतिशय बहुमोल ठरणार आहे. अशा आघाडीच्या कारखानदारांत कै. गणपतराव ऊर्फ बाबुराव साठे यांचा खास गौरवपूर्वक उल्लेख करावा लागेल.

बिस्किटें व चॉकोलेटचे प्रमुख कारखानदार म्हणून त्यांचें नांव आतां सर्वतोमुखीं झालेलें आहे. पण ४०–४२ वर्षांपूर्वी ते या उद्योगाकडे वळलें तेव्हां त्यांना ओळखणारे अगदीं थोडेजण होते. घरची स्थिति फारच गरिबीची. शिक्षणहि अगदीं बेताचें. कोणता तरी नवा उद्योग करावा, ही मात्र दुर्दम्य इच्छा. हेंच त्यांचें एकमेव भांडवल. या कल्पनेंत मग्न असतां त्यांच्या मातुःश्री श्री. सीताबाई यांनीं घरीं बनविलेल्या बिस्किटांकडे त्यांचें लक्ष गेलें व हाच धंदा त्यांच्या मदतीनें करावयाचें त्यांनीं ठरविलें.

पण हें काम थोडेंच तेवढें सोपें होतें? घरगुती प्रमाणावर हा माल कितीसा होणार? तो खपवायचा कसा? शिवाय त्या वेळीं बिस्किटें करणाऱ्या एका ब्रिटिश कंपनीनें साऱ्या बाजारपेठेचा कबजा घेतलेला. हीं बिस्किटें सर्वांना आवडत, इतकेंच नव्हे तर तीं वापरण्यांत प्रतिष्ठित समाजाला मोठें भूषणहि वाटे. या कंपनीच्या समोर बाजारांत उभें राहणें साधेंसुधें काम नव्हतें. पण बाबुराव या सामन्याला डगमगले नाहींत. त्यांची हिंमत व प्रयत्नवाद जबरदस्त म्हणूनच ते या सर्व अडचणींना पुरून उरले व त्यांनीं आपला बिस्किटांचा उद्योग झगझगीतपणें यशस्वी करून दाखविला.

पण एवढ्यावरच ते थांबले नाहींत. त्यांनीं चॉकोलेट व कोकोची जोड आपल्या बिस्किटांच्या कारखान्याला द्यावयाचें ठरविलें. यांत बिस्किटांच्या धंद्यापेक्षाहि जास्त अडचणी. पण अशा अडचणींची त्यांना भीति वाटण्याऐवजीं तें एक आकर्षणच वाटायचें. याहि धंद्यांत टाकलेलें पाऊल त्यांनीं यशस्वी करून दाखविलें. एवढेंच नव्हे तर सिंधसारख्या दूरच्या प्रांतांत कराची येथें चॉकोलेटचा एक नवा कारखाना स्थापन करून स्वतःच्या क्षेत्रांत एक अपूर्व विक्रम करून दाखविला. अटकेपार झेंडा नेणाऱ्या शूर मराठ्यांचीच या वेळीं त्यांनीं सर्वांस आठवण करून दिली.

अगदीं अल्प प्रमाणावर आरंभ करून बाबुरावांनीं आपल्या उद्योगांत असें मोठें यश मिळविलें. खासगी कारखान्याचें मोठ्या भांडवलाच्या कंपनींत रूपांतर केलें. त्यांच्या मालाचा लाखों रुपयांनीं स्वदेशांत व परदेशांत खप होऊं लागला. स्वतःच्या उद्योगानिमित्त ४–५ वेळां विलायत–अमेरिकेचा ते प्रवास करून आले, पण त्यांची साधी राहणी अथवा विनयशील स्वभाव यांत मात्र कसलाच फरक झाला नाहीं. पहिल्या सारखीच सौम्य व निगर्वी वृत्ति.

त्यांचा उद्योगाचा व्याप इतका वाढला व त्याला स्थैर्य आलें म्हणून त्यांच्या मागच्या काळज्या सरल्या असें मात्र झालें नाहीं. जुन्या काळज्या गेल्या तर सरकारी नियंत्रण व कामगारविषयक कायदे असे नवे प्रश्न पुढें आले. पण तेहि त्यांनीं मोठ्या पद्धतशीरपणें व कुशलतेनें हाताळले.

आजकाल कोणत्याहि कारखानदाराला कामगारांना राजी राखून त्यांजकडून दैनंदिन कामकाज करवून घेणें हा केवढा कूटप्रश्न होऊन बसला आहे, याची बहुतेकांस कल्पना असेलच. पण बाबुरावांना त्यांच्या कामगारांबद्दल अलोट कळकळ व सहानुभूति वाटे. त्यामुळेंच कामगार–मालक संबंधांत क्वचितच दृष्टोत्पत्तीस येणारा कामगारांचा लोभ व विश्वास त्यांच्या वाट्यास आला. बाबूरावांचें अंतःकरण कोवळें, त्यामुळें जवळच्या असो, दूरच्या असो, साऱ्या नात्यागोत्यांच्या मंडळींशीं त्यांचें वागणें फार प्रेमळपणाचें.

कै. बाबूरावांची धुरा पुढें संभाळण्यास त्यांच्याच तालमींत तयार झालेले त्यांचे बंधु, नव्या पिढीची साठे मंडळी आणि त्यांचे विश्वासू हस्तक सिद्ध असल्यानें त्यांनीं स्थापन केलेल्या संस्थेच्या भावी विकासाविषयीं कोणासहि चिंता बाळगावयास नको हें मोठेंच समाधान होय. ह्या त्यांच्या आप्तेष्टांना, स्नेह्यांना व चाहत्यांना कै. बाबूरावांविषयीं किती आदर व गाढ प्रेम वाटत होतें याची प्रस्तुत गौरवग्रंथावरून कोणासहि कल्पना येऊं शकेल. हा ग्रंथ त्यांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्याप्रमाणें कै. बाबूरावांचें समग्र चरित्रहि त्यांत आलें आहे. कै. बाबूरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांनीं केलेल्या जिवापाड उद्योगाचा व त्यांच्या अंगीं वसत असलेल्या अनेक उत्कट गुणांचा त्यावरून कोणासहि यथायोग्य परिचय होऊं शकेल. त्या अर्थानें या पुस्तकामुळें मराठी चरित्रग्रंथांत एक उल्लेखनीय भर पडली आहे असेंहि म्हणतां येईल.

महाराष्ट्राचा कायाकल्प घडवून आणणारी कोयनेची वीज आतां लवकरच सर्वत्र खेळूं लागेल. त्या शक्तीवर अनेक प्रकारचे लहान–मोठे कारखाने काढण्यास होतकरू व उत्साहि तरुणांनीं भराभर पुढें आलें पाहिजे. त्यांतच त्यांचा उत्कर्ष व तरणोपाय आहे. त्या दृष्टीनें तरुण पिढीला औद्योगिक क्षेत्राकडे आकृष्ट करूं शकेल असें जेवढें साहित्य निघूं शकेल, तेवढें या वेळीं हवें आहे. त्या सदरांत हा गौरवग्रंथ नक्की बसूं शकेल. अशा प्रकारची इष्ट प्रेरणा व स्फूर्ति या ग्रंथाच्या वाचनानें अनेक तरुणांना मिळेल अशी मी आशा बाळगतों.

---

* संपादक व प्रकाशक : नारायण रामचंद्र साठे, एम्. एस्सी. मॅ. डायरेक्टर, साठे फूड इंडस्ट्रीज प्रा. लि. पुणें. २ पृ. २३८

## ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ बार्बरा वॉर्ड ह्यांची भारतीय नियोजनाची पाहणी

नामवंत ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ व आंतरराष्ट्रीय घडामोडींवर लेखन करणाऱ्या सुप्रसिद्ध लेखिका बार्बरा वॉर्ड गेले दोन महिने भारतांत आहेत. भारताच्या नियोजन मंडळानें दिलेल्या निमंत्रणानुसार त्यांची ही भेट आहे. नियोजन मंडळाबरोबर त्यांनीं सुमारें दोन आठवडे चर्चा, विचारविनिमय करून सध्यांच्या नियोजनांतील अडचणी व विकास कोणत्या रीतीनें साधतां येईल याहि बाबतींत त्यांनीं सूचना केल्या आहेत.

अर्थरचनेचे मूलभूत घटक पोलाद, कोळसा, विद्युत्, दळणवळण व अन्नधान्य यांतील सध्यांच्या आणीबाणीच्या काळांत विकास व अडचणी आणि भारताची परकी चलनाची गरज इत्यादि प्रश्नांचा मिस् वॉर्ड ( खाजगी जीवनांतील लेडी जॅक्सन ) यांनीं अभ्यास केला आहे.

१९५२ मध्यें त्यांना व त्यांच्या पतिराजांना प्रथमच भारत भेटीचें निमंत्रण देण्यांत आलें होतें. त्यावेळेपासून त्यांचा भारतीय नियोजनाशीं संबंध आला. १९६१ मध्यें त्यांनीं भारतास भेट दिली व नंतर त्यांनीं "इंडिया ॲण्ड दि वेस्ट" हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. भारत सरकारच्या प्रकाशन विभागानें तो पुन: प्रकाशित केला. भारताच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची लंडनच्या "दि इकॉनॉमिस्ट" साप्ताहिकासाठीं काढलेली खास पुरवणी त्यांनींच तयार केलेली होती.

नवी दिल्ली येथें दि. ११ ते १६ नोव्हेंबरपर्यंत भरलेल्या जागतिक वैद्यकीय परिषदेच्या अधिवेशनास मिस् वॉर्ड उपस्थित राहिल्या होत्या. "आर्थिक बदल आणि ग्रामीण विकास" या विषयांवर त्यांनीं तेथील सभासदांना उद्देशून व्याख्यान दिलें.

मिस् बार्बरा यांनीं आपलें प्रारंभींचें शिक्षण इंग्लंड व परदेशांत पुरें केलें. ऑक्सफर्ड विद्यापीठांतून त्यांनीं १९३५ मध्यें तत्त्वज्ञान, राजकारण व अर्थशास्त्र विषयांची 'ऑनर्स' पदवी संपादन केली. सुमारें तीन वर्षें विद्यापीठांत "युनिव्हर्सिटी एक्स्टेन्शन लेक्चरर" म्हणून काम पाहिल्यावर १९३९ मध्यें त्या "दि इकॉनॉमिस्ट" मध्यें 'सहाय्यक संपादक' म्हणून दाखल झाल्या. घानाच्या विकास मंडळाचे सध्यांपर्यंतचे अध्यक्ष असलेले सर रॉबर्ट जॅक्सन यांच्याशीं त्यांचा १९५० मध्यें विवाह झाला.

अविकसित देशांच्या अडचणींचा मिस् वॉर्ड यांनीं अलीकडे खास अभ्यास केला आहे. फेथ ॲण्ड फ्रीडम ( १९५४ ). इन्टर प्ले ऑफ ईस्ट ॲण्ड वेस्ट ( १९५७ ), फाइव्ह आयडिआ दॅट चेंज दि वर्ल्ड ( १९५९ ) आणि दि रिच नेशन्स ॲण्ड दि पुअर नेशन्स ( १९६२ ) हीं त्यांचीं कांहीं गाजलेलीं पुस्तकें होत. फोर्डहॅम युनिव्हर्सिटी, ब्रॅंडिस युनिव्हर्सिटी, केनयन कॉलेज आणि हॉर्वर्ड युनिव्हर्सिटी यांच्याकडून मिस् बार्बरा यांना सन्माननीय डॉक्टरेटची पदवी बहाल करण्यांत आली आहे.

सांस्कृतिक जीवनांतहि मिस् वॉर्ड आस्थेनें भाग घेत असतात. "सॅडलर्स वेल्स" आणि "ओल्ड विक् थिएटर्स" लंडनच्या त्या नऊ वर्षें गव्हर्नर होत्या; व ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनच्याहि सुमारें चार वर्षें त्या गव्हर्नर होत्या.


दातांच्या स्वच्छतेसाठीं

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

बॅंक ऑफ महाराष्ट्राची

# रिकरिंग डिपॉझिट स्कीम

तुम्हांला शिल्लक टाकणें सोपें जावें व व्याजही भरपूर मिळावें अशी एक योजना महाराष्ट्र बॅंकेनें तयार केली आहे. **रिकरिंग डिपॉझिट स्कीम**—या खात्यांत आपण दरमहा १० रु. अगर १०च्या पटींत ५०० रुपयापर्यंत कितीहि रक्कम २ वर्षे भरावयाची. दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं आपल्या खात्यावर ४ टक्के व्याजानें मोठी रक्कम जमा झालेली दिसेल.

दरमहा जी रक्कम आपण ठरवूं तेवढीच नियमितपणें २ वर्षे टाकावयाची. उदा. रु. १०/- महिना रिकरिंग डिपॉझिट खात्यांत टाकले तर २ वर्षांच्या शेवटीं आपणांस रु. २५०/- मिळतील. या बचतीचा उपयोग आपल्याला कितीतरी चांगल्या गोष्टींसाठीं करितां येईल.



४ टक्के व्याजाची नवीन योजना

तुमचे पैसे कसे वाढतात तें पहा

| मासिक बचत | २४ महिन्यांनंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| १० | २५० |
| २० | ५०० |
| ३० | ७५० |
| ४० | १,००० |
| ५० | १,२५० |
| ६० | १,५०० |
| १०० | २,५०० |
| २०० | ५,००० |
| ३०० | ७,५०० |
| ४०० | १०,००० |
| ५०० | १२,५०० |

मोफत माहिती पत्रकासाठीं लिहा अगर बॅंकेच्या शाखेत येऊन भेटा.

**दि बॅंक ऑफ महाराष्ट्र लि.**

• मुख्य कचेरी • थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

Pratibha-62-5

## ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ बार्बरा वॉर्ड ह्यांची भारतीय नियोजनाची पाहणी

नामवंत ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ व आंतरराष्ट्रीय घडामोडींवर लेखन करणाऱ्या सुप्रसिद्ध लेखिका बार्बरा वॉर्ड गेले दोन महिने भारतांत आहेत. भारताच्या नियोजन मंडळानें दिलेल्या निमंत्रणानुसार त्यांची ही भेट आहे. नियोजन मंडळाबरोबर त्यांनीं सुमारें दोन आठवडे चर्चा, विचारविनिमय करून सध्यांच्या नियोजनांतील अडचणी व विकास कोणत्या रीतीनें साधतां येईल याहि बाबतींत त्यांनीं सूचना केल्या आहेत.

अर्थरचनेचे मूलभूत घटक पोलाद, कोळसा, विद्युत्, दळणवळण व अन्नधान्य यांतील सध्यांच्या आणीबाणीच्या काळांत विकास व अडचणी आणि भारताची परकी चलनाची गरज इत्यादि प्रश्नांचा मिस् वॉर्ड ( खाजगी जीवनांतील लेडी जॅक्सन ) यांनीं अभ्यास केला आहे.

१९५२ मध्यें त्यांना व त्यांच्या पतिराजांना प्रथमच भारत भेटीचें निमंत्रण देण्यांत आलें होतें. त्यावेळेपासून त्यांचा भारतीय नियोजनाशीं संबंध आला. १९६१ मध्यें त्यांनीं भारतास भेट दिली व नंतर त्यांनीं "इंडिया ॲण्ड दि वेस्ट" हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. भारत सरकारच्या प्रकाशन विभागानें तो पुन: प्रकाशित केला. भारताच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची लंडनच्या "दि इकॉनॉमिस्ट" साप्ताहिकासाठीं काढलेली खास पुरवणी त्यांनींच तयार केलेली होती.

नवी दिल्ली येथें दि. ११ ते १६ नोव्हेंबरपर्यंत भरलेल्या जागतिक वैद्यकीय परिषदेच्या अधिवेशनास मिस् वॉर्ड उपस्थित राहिल्या होत्या. "आर्थिक बदल आणि ग्रामीण विकास" या विषयांवर त्यांनीं तेथील सभासदांना उद्देशून व्याख्यान दिलें.

मिस् बार्बरा यांनीं आपलें प्रारंभींचें शिक्षण इंग्लंड व परदेशांत पुरें केलें. ऑक्सफर्ड विद्यापीठांतून त्यांनीं १९३५ मध्यें तत्त्वज्ञान, राजकारण व अर्थशास्त्र विषयांची 'ऑनर्स' पदवी संपादन केली. सुमारें तीन वर्षें विद्यापीठांत "युनिव्हर्सिटी एक्स्टेन्शन लेक्चरर" म्हणून काम पाहिल्यावर १९३९ मध्यें त्या "दि इकॉनॉमिस्ट" मध्यें 'सहाय्यक संपादक' म्हणून दाखल झाल्या. घानाच्या विकास मंडळाचे सध्यांपर्यंतचे अध्यक्ष असलेले सर रॉबर्ट जॅक्सन यांच्याशीं त्यांचा १९५० मध्यें विवाह झाला.

अविकसित देशांच्या अडचणींचा मिस् वॉर्ड यांनीं अलीकडे खास अभ्यास केला आहे. फेथ ॲण्ड फ्रीडम ( १९५४ ), इन्टर प्ले ऑफ ईस्ट ॲण्ड वेस्ट ( १९५७ ), फाइव्ह आयडिआ दॅट चेंज दि वर्ल्ड ( १९५९ ) आणि दि रिच नेशन्स ॲण्ड दि पुअर नेशन्स ( १९६२ ) हीं त्यांचीं कांहीं गाजलेलीं पुस्तकें होत. फोर्डहॅम युनिव्हर्सिटी, ब्रॅंडिस युनिव्हर्सिटी, केनयन कॉलेज आणि हॉर्वर्ड युनिव्हर्सिटी यांच्याकडून मिस् बार्बरा यांना सन्माननीय डॉक्टरेटची पदवी बहाल करण्यांत आली आहे.

सांस्कृतिक जीवनांतहि मिस् वॉर्ड आस्थेनें भाग घेत असतात. "सॅडलर्स वेल्स" आणि "ओल्ड विक् थिएटर्स" लंडनच्या त्या नऊ वर्षें गव्हर्नर होत्या; व ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनच्याहि सुमारें चार वर्षें त्या गव्हर्नर होत्या.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

बँक ऑफ महाराष्ट्राची

रिकरिंग डिपॉझिट स्कीम

तुम्हांला शिल्लक टाकणें सोपें जावें व व्याजही भरपूर मिळावे अशी एक योजना महाराष्ट्र बँकेनें तयार केली आहे. **रिकरिंग डिपॉझिट स्कीम**—या खात्यांत आपण दरमहा १० रु. अगर १०च्या पटींत ५०० रुपयापर्यंत कितीहि रक्कम २ वर्षे भरावयाची. दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं आपल्या खात्यावर ४ टक्के व्याजानें मोठी रक्कम जमा झालेली दिसेल.

दरमहा जी रक्कम आपण ठरवूं तेवढीच नियमितपणें २ वर्षे टाकावयाची. उदा. रु. १०/- महिना रिकरिंग डिपॉझिट खात्यांत टाकले तर २ वर्षांच्या शेवटीं आपणांस रु. २५०/- मिळतील. या बचतीचा उपयोग आपल्याला कितीतरी चांगल्या गोष्टींसाठीं करितां येईल.



४ टक्के व्याजाची नवीन योजना

मोफत माहिती पत्रकासाठीं लिहा अगर बँकेच्या शाखेंत येऊन भेटा.

तुमचे पैसे कसे वाढतात तें पहा

| मासिक बचत | २४ महिन्यानंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| १० | २५० |
| २० | ५०० |
| ३० | ७५० |
| ४० | १,००० |
| ५० | १,२५० |
| ६० | १,५०० |
| १०० | २,५०० |
| २०० | ५,००० |
| ३०० | ७,५०० |
| ४०० | १०,००० |
| ५०० | १२,५०० |

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

• मुख्य कचेरी •
थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

Pratibha 63 E

## युद्धाच्या जोखमीचा सक्तीनें विमा

### कालपासून हप्ते सुरू झाले

भारत सरकारनें माल आणि कारखाने ह्यांच्या युद्धाच्या जोखमीच्या योजना जाहीर केल्या, त्या १ जानेवारी पासून अमलांत आल्या. शत्रूनें केलेलें नुकसान आणि शत्रु हटवितांना झालेलें नुकसान, ह्या दोहोंसहि विम्याचा फायदा मिळेल. ३० हजारांपेक्षा जास्त मालमत्तेच्या कारखान्यांना विमा सक्तीनें उतरावा लागेल. मालाच्या विम्याचा हप्ता १९६३ च्या पहिल्या तिमाहासाठी दर १०० रु. ला १५ न. पैसे असून कारखान्याच्या विम्याचा हप्ता दर १०० रु. ला २५ न. पैसे ठरविण्यांत आला आहे. मार्च, १९६३ पूर्वी हप्त्यांच्या दरांचा पुनः विचार केला जाईल. ओरिएंटल फायर अँड जनरल इन्शुअरन्स कंपनी मध्यवर्ती सरकारतर्फे ह्या विमायोजनांची अंमलबजावणी करील.

---

### राष्ट्रीय संरक्षण निधि

दिल्ली येथील मध्यवर्ती राष्ट्रीय संरक्षण निधींत २६ डिसेंबर, १९६२ अखेर २५ कोटी रु. जमा झाले आहेत.

---

### जपानमधील कोळसा खाणींची परिस्थिति

तेल आणि इतर औद्योगिक इंधनें ही कोळशापेक्षा ज्यास्त कार्यक्षेम असल्यामुळें जपानमधील कोळशास मागणी कमी होत चालली आहे; तेथील सुमारें ७० हजार कोळसा-कामगारांवर अपत्ति येण्याचा संभव आहे. कोळसा खाणींतून यंत्रांचा वापर वाढवून कांहीं खाणी बंद ठेवून, उत्पादनाचा खर्च उतरविणें तेथें भाग पडणार आहे.

---

### मिसेस रुझवेल्टच्या स्मृतीसाठी पोस्टाचें तिकीट

मिसेस एलेनर रुझवेल्ट ह्यांच्या ७९ व्या वाढदिवशीं, म्हणजे ११ ऑक्टोबर १९६३ रोजीं अमेरिकन सरकार पोस्टाचें एक खास तिकीट काढणार आहे. मिसेस रुझवेल्ट कांहीं आठवड्यांपूर्वी मरण पावल्या.

---

### सॉमरसेट मॉमचा दावा

सॉमरसेट मॉम ह्या सुप्रसिद्ध इंग्रज लेखकानें फ्रान्समध्यें एक दावा लावून आपल्या 'मुली'कडून २० लक्ष डॉलर परत मिळावेत अशी मागणी केली आहे. तिनें ही रक्कम त्यांचेकडून घेतली आहे, पण ती त्यांची औरस मुलगी नाहीं, असा त्यांचा दावा आहे.

---

### नवा फ्रँक साधा फ्रँक झाला

फ्रान्समधील फ्रँकला "नवा फ्रँक" असें १ जानेवारीपासून म्हटलें जाणार नाहीं; त्याला केवळ "फ्रँक" असेंच म्हटलें जाईल. "जुना फ्रँक" आणि "नवा फ्रँक" अशीं चलनें चालू होतीं, त्या वेळीं "नवा फ्रँक" म्हणणें ठीक होतें. आपला नया पैसासुद्धां कांहीं काळानें साधा पैसा बनेल.

---

### २७ जानेवारी रोजीं रविवार, पण सुट्टी नाहीं

२७ जानेवारी १९६३ रोजीं रविवार असला, तरी महाराष्ट्र सरकारी नोकरांना सुट्टी मिळणार नाहीं. १९६३ मधील सार्वजनिक सुट्टयांना महाराष्ट्र सरकारनें कात्री लावली असून शनिवारीं किंवा सोमवारीं सार्वजनिक सुट्टी आली तर रविवारीं काम चालू राहील असें जाहीर केलें आहे.

## पुणें सें. को. बँकेची वार्षिक सभा

पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेची ४५ वी वार्षिक साधारण सभा सोमवार, दिनांक ३१ डिसेंबर, १९६२ रोजीं नू. म. वि. प्रशालेंत सायंकाळीं ५ वाजतां भरली होती. बँकेच्या कांहीं सन्माननीय सभासदांनीं सन १९६१–६२ चे अहवालासंबंधीं आपापले विचार व्यक्त केले. त्यानंतर श्री. मुगुटराव काकडे यांनीं सन १९६१–६२ चा अहवाल एकमतानें मंजूर व्हावा अशी सभेला विनंती केली. अहवाल सभेनें टाळ्यांच्या कडकडाटांत मंजूर केला. अहवाल मंजूर झाल्यावर बँकेचे अध्यक्ष मा. शिवाजीराव काळे यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत सभासदांनीं विचारलेल्या कांहीं प्रश्नांना समाधानकारक उत्तरें देऊन पुणें सेंट्रल को-ऑप. बँक ही महाराष्ट्रांत अग्रगण्य बँक म्हणून गणली जाईल असें आश्वासन दिलें.

यानंतर सन १९६२–६३ सालाकरितां निवडून आलेल्या संचालकांचीं नांवें जाहीर करण्यांत येऊन अध्यक्षपदीं श्री. शि. भि. निंबाळकर व उपाध्यक्षपदीं श्री. पं. शं. शेळके यांची बहुमतानें नेमणूक झाली. सन १९६२–६३ सालाकरितां खालील संचालकांची बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ति झाली. श्री. शि. भि. निंबाळकर, श्री. पं. शं. शेळके, श्री. शि. म. काळे, श्री. के. पां. पवार, श्री. वि. स. देशमुख, श्री. वि. गे. मोरे, श्री. अ. बं. ढमढेरे, श्री. सा. मा. सातकर, श्री. बा. सा. काकडे, श्री. बा. स. ढोले, श्री. म. तु. वाबळे, श्री. शं. य. भेलके, श्री. ब. धों. साखरे, श्री. ना. कृ. साठे, श्री. भि. दे. तांबे, श्री. दि. वि. इनामदार, श्री. वा. ब. गोगटे, श्री. द. ल. पारखी, श्री. रा. य. बोरकर, श्री. ल. गो. सहस्रबुद्धे, श्री. मु. सा. काकडे, श्री. उद्धवराव इंगवले, व श्री. मो. कुं. फिरोदिया.

सभेंत मा. अध्यक्ष यांनीं शाहू मंदिर महाविद्यालयास रु. १०,००० व संरक्षण निधीस रु. १०,००० याप्रमाणें मदत जाहीर केली.

---

### अनौरस संततीचें प्रमाण आठांत एक!

लंडनमध्यें गेल्या वर्षी जन्मलेल्या प्रत्येक आठ अर्भकांपैकीं एक अर्भक अनौरस होतें, असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

---

### मि. गालब्रेथ पुनः प्रोफेसरचे जागीं जाणार

अमेरिकेचे भारतांतील वकील, मि. गालब्रेथ, हे मूळचे प्रोफेसर आहेत; त्यांच्या विद्यापीठानें त्यांना दिलेल्या रजेच्या मुदतींत ते येथें अमेरिकेचें प्रतिनिधित्व करीत आहेत. त्यांची रजा विद्यापीठानें आतां आणखी वाढविली आहे.

---

### तारापूर येथील अणुशक्तीचें वीज-केंद्र

महाराष्ट्रांत तारापूर ह्या ठिकाणीं अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणाऱ्या केंद्राची उभारणी करण्यासाठी भारत व अमेरिका लवकरच एका करारावर सह्या करतील. वीजकेंद्रावर आंतरराष्ट्रीय अणुशक्ति मंडळाचें नियंत्रण असावें असा अमेरिकेचा आग्रह आहे. भारताचा नियंत्रणाला विरोध आहे. तथापि हा प्रश्न ताणून धरण्याचा अमेरिकेचा विचार दिसत नाहीं. नियंत्रणाची आवश्यकता मात्र अमेरिका नमूद करील. अमेरिकेची जनरल-इलेक्ट्रिक कंपनी १० कोटी डॉलर्स खर्चून केंद्रासाठी लागणारी अणुभट्टी बांधणार आहे.

## दक्षिण महाराष्ट्रांतील पहिली सहकारी सूत-गिरणी

दि डेकन को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल्स लि. ह्या महाराष्ट्रांतील पहिल्या सहकारी गिरणीचें उद्घाटन राष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीं इचलकरंजीला १८ नोव्हेंबर रोजीं केलें. या गिरणीचें उद्घाटन हा दक्षिण महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतींतील एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल. आपत्तीखालीं दबून न जातां तिच्यावर मात करण्याच्या मानवी प्रयत्नांचें तें प्रतीक मानावें लागेल. कारण, यंत्रमाग धंद्यावर कोसळलेल्या आपत्तींतून ही गिरणी साकार झाली आहे.

१९५५ सालापासून यंत्रमागांवर अबकारी कर बसविण्यांत आला. नंतर कापड-उत्पादनाची जबाबदारी विविध घटकांत विभागून दिल्यानें आणखी कांहीं अडचणी आल्या. सुतासाठी हातमाग व यंत्रमाग यांना नेहमींच गिरण्यांवर अवलंबून राहावें लागतें. गिरण्या पुरवितील त्या दर्जाचें सूत, त्या म्हणतील त्या दरानें घेणें प्राप्त असतें. सुताच्या किंमती नेहमींच वाढत जात असल्यानें यंत्रमाग धंद्यापुढें मोठी बिकट परिस्थिति निर्माण होत गेली. ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठी सहकारी सूत गिरणीची कल्पना निघाली आणि ती गेल्या १८ नोव्हेंबरला प्रत्यक्षांत उतरली.

दि डेकन को-ऑप. स्पिनिंग मिल्स लि. ही पन्नास लाख रुपये भांडवलाची संस्था ३ डिसेंबर, १९६० रोजीं रजिस्टर करण्यांत आली. हें भांडवल प्रत्येकीं एक हजार रुपयांच्या पांच हजार शेअर्समध्यें विभागलेलें आहे. सध्यां वसूल झालेलें भांडवल वीस लाख रुपये असून त्यांतील दहा लाख सभासदांचें व दहा लाख महाराष्ट्र सरकारचें आहे. इंडस्ट्रियल फिनॅन्स कार्पोरेशनकडून तीस लाख रुपयांचें कर्ज मिळवायचें आहे. सुमारें सव्वीस एकर जागा संस्थेनें घेतली असून तिच्यावर सुमारें पावणेदहा लाखांच्या इमारती बांधल्या आहेत व एकेचाळीस लाखांहून अधिक किंमतीची यंत्रसामग्री उभारली आहे. संस्थेला बारा हजार चात्यांचा परवाना मिळाला आहे. संस्थेची सभासदसंख्या सध्यां २०२ असून त्यांच्या मालकीचे ७०२ यंत्रमाग व १०५० हातमाग आहेत. दररोज तीन पाळ्यांमध्यें ३,००० पौंड सूत निर्माण होईल व तें सभासदांच्या मागांना पुरविण्यांत येईल. गरजेपेक्षां हें उत्पादन कमी असल्यानें चात्यांची संख्या दुप्पट करण्याची संस्थेची योजना असून त्यासाठी सरकारी परवाना मागण्यांत आला आहे. संस्थेचें भांडवलहि वाढवून १ कोटि रुपयांवर नेण्याचा संस्थेचा मानस आहे. विजेची गरज सध्यां संस्थेच्याच वीज-निर्मिति यंत्राद्वारें भागविली जाते, पण लवकरच कोयनेची वीज मिळूं लागेल.

श्री. अरविंद गणेश उर्फ आबासाहेब कुलकर्णी हे संस्थेचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्राचे भूतपूर्व मुख्य मंत्री श्री. यशवन्तराव चव्हाण यांनी सूत-गिरणीची ही योजना कार्यवाहींत आणण्यासाठी सर्वतोपरी साह्य केलें. उद्घाटन करतांना राष्ट्रपतींनीं ह्या सहकारी प्रयत्नाचें व लोकांच्या उद्यमशीलतेचें कौतुक करून संस्थेला सुयश चिंतिलें.

---

### संस्कृतांत म. गांधींचें आत्मचरित्र

गांधी स्मारक निधीतर्फे महात्मा गांधींच्या आत्मचरित्राचें संस्कृत रूपांतर लवकरच प्रसिद्ध होणार आहे. बंगलोर येथील ८५ वर्षांचे ज्ञानवृद्ध श्री. नागप्प शास्त्री ह्यांनीं हें भाषांतर केलें आहे.

### संगीतावर पोसलेलीं केळीं

भास्करराजपुरम् येथील एका प्रगतिप्रिय मिरासदाराच्या केळीच्या बागा आहेत. त्यानें त्या बागांचे दोन भाग केले. दोन्ही भागांतील केळींना सारखेंच खतपाणी दिलें. पण एका भागांतील केळींच्या झाडांना दररोज सकाळीं ७-३० ते ८ पर्यंत रागदारीचें संगीत ऐकविलें; वेगवेगळ्या रागांतील ध्वनिमुद्रित संगीत वाजवलें जाई. ह्या संगीताचा श्रवणभक्त केळीवर विलक्षण अनुकूल परिणाम झाला. मिरासदारानें हें प्रत्यक्ष अवलोकन करण्यासाठी अन्नमलई विद्यापीठाच्या बॉटनी शाखेचे प्रमुख, डॉ. टी. सी. एन. सिंग ह्यांना पाचारण केलें. ते आपल्या एम. एससी. च्या १८ विद्यार्थ्यांसह भास्करराजपुरमला गेले आणि त्यांनीं तुलनात्मक परीक्षण केलें. त्यांना आढळून आलें कीं संगीतश्रवण न केलेल्या केळींना पांच पानें होतीं, त्यांची उंची ६२ सें. मी. होती आणि परिघ १८ सें. मी. होता. ह्याउलट, संगीतभक्त केळींना १२ पानें फुटलीं होतीं; ९२ सें. मी. पर्यंत त्यांची उंची होती आणि त्यांचा परिघ ३२ सें. मी. होता.. संगीतावर पोसलेलीं झाडें आकर्षक दिसत होतीं. त्यांच्या घडांना २५० ते २८० केळीं होतीं; इतरांच्या घडांत फक्त ८० ते ९५ केळीं होतीं; सहाजिकच, घडांना किंमतहि त्या प्रमाणांत ज्यास्त-कमी आली. अशा रीतीनें, सर्वच बाबतींत संगीताचा अनुकूल परिणाम घडून आला. केळीवर संगीताचा केलेला हा प्रयोग अभिनव आहे; कॅनडांत संगीतावर पोसलेल्या गव्हाचें उत्पादन ६६ टक्के वाढलें असल्याचें नमूद आहे.

मिरासदाराचें नांव श्रीनिवास अय्यर असून त्यांच्या बंधूचें नांव रामचंद्रन् असें आहे; त्या दोघांनीं मिळून संगीताचा हा प्रयोग केला आहे. अशीं केळीं दीर्घ काळ लहानपणापासून खाणाऱ्यावर संगीताचा कांहीं परिणाम होतो का, हा प्रयोग पुढें करतां येण्याजोगा आहे !

---

### आत्महत्येचा तत्काळ बचाव

दारिद्र्य, वृद्धावस्था आणि आजार ह्यांवर उपाययोजना करण्यांत आपल्यासारखे गरीब देश गुंतले आहेत, तर ऑस्ट्रेलिया समृद्धीच्या एका दुष्परिणामावर-आत्महत्येच्या प्रवृत्तीवर उपाय योजीत आहे. आर्थिक स्वास्थ्याचा तो एक दुष्परिणाम आहे. आत्महत्या करण्याची इच्छा होणारांना तत्काळ धीर देण्यासाठी सिडने येथें "लाइफलाईन" केंद्र उघडण्यांत येत आहे. ह्या केंद्रांत २४ तास कार्यकर्ते उपलब्ध असतील; टेलिफोन येतांच ते "रुग्णा" शीं रेडिओ-टेलिफोननें बोलून त्याला आत्महत्येपासून परावृत्त करतील; जरूर तर प्रत्यक्ष जाऊन भेटतील. आत्महत्येचा विचार मनांतून गेल्यावर ज्यांना आवश्यक वाटेल अशांना ते विवाहविषयक सल्लाहि देतील.

---

### "वेक अप" (उठा) घड्याळें

हॅरॉलजी इंडस्ट्रीज प्रा. लि. नें तयार केलेलीं हीं गजराचीं घड्याळें २७ डिसेंबर रोजीं बाजारांत आलीं. घड्याळाच्या भागांपैकीं ६०% भाग भारतीय बनावटीचे आहेत. उरलेले भाग प. जर्मनी व युगोस्लाव्हिया येथून आयात केले जातात. १९६५ अखेर ९५% भाग भारतीय बनावटीचे होतील. दरमहा २,५०० घड्याळें तयार होतील. प्रत्येकाची किंमत ४५ रु. असेल. घड्याळाला 'वेक अप' असें नांव दिलेलें आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.